नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 21/01/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो. स्टे. केळवद :– फिर्यादी नामे– हरीश महादेव वाघमारे, वय 35 वर्षे, रा. सावळी बु. ता. कळमेश्वर जि. नागपुर यांची मुलगी/पीडिता सौ. कल्याणी प्रविण पगारे, वय 30 वर्षे हिला तिचे सासरचे लोक आरोपी क्र. 1) प्रविण दाजीबा पगारे(पती), वय 32 वर्ष, 2) दाजीबा पगारे(सासरे), वय 61 वर्ष, 3) जगदीश पगारे, वय 37 वर्ष, 4) मनीषा पगारे, सर्व रा. ढालगाव खैरी ता. सावनेर, 5) करूणा वानखेडे, रा. केळवद व 6) सोनु ह.मु. उमरेड यांनी आपसात संगनमत करून पीडितेला घरगुती लहान–सहान कारणावरून, झगडाभांडण व शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ करीत होते. पीडितेने अश्या नेहमीच्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळुन, आरोपीतांनी तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. पीडितेने आरेपीतांच्या त्रासाला कंटाळुन दि. 18/01/2021 चे 15.30 वा. पुर्वी सासरी जावुन घराचे मागे असलेल्या बाथरूम मध्ये नायलॉन दोरीने स्वतः ला गळफास लावुन आत्महत्या केली. मर्ग क्र. 03/21 क. 174 जाफौ. दि. 18/01/2021 च्या चौकशीत निष्पन्न झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 306, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/अर्जुन राठोड पो.स्टे. केळवद 86055 85606 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर